## नि. दि. दा. क्र. १४२/२०२० मधील नि.१६ वरील आदेश

( सी.एन.आर. क्र. MHSN110006692020)

१. प्रस्तुतच्या अर्जान्वये प्रतिवादी यांनी त्यांच्याविरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्दबातल करून त्यांची कैफियत कामी समाविष्ट करून घेणेबाबत विनंती केली आहे.

२. प्रतिवादीच्या अर्जामधील कथन असे की, प्रतिवादी यांना दि. २६/०१/२०२१ रोजीचे तारखेचे समन्स व नोटीसची बजावणी झालेली होती. तथापि २६/०१/२०२१ रोजी न्यायालयास सुट्टी असल्यामुळे प्रतिवादी यांना सदर दाव्यामध्ये हजर होऊन कैफियत व म्हणणे देता आले नाही. तसेच कोव्हीड–१९ च्या महामारीनेदेखील प्रतिवादींना माहिती व कागदपत्रे काढून वकीलांना भेटून कैफियत मांडता आली नाही त्यामुळे प्रतिवादींचे विरुध्द एकतर्फा आदेश झालेला आहे. तरी न्यायाच्या दृष्टीने एकतर्फा आदेश रद्द करणेची विनंती प्रतिवादींनी केली.

३. वादी यांनी नि. १६ खाली स्वतःचे म्हणणे दाखल करून अर्जास विरोध दर्शविलेला आहे. वादी यांना सदर अर्जातील मजकूर मान्य नाही. सदर अर्जासोबत विलंबाबाबत कोणतेही कारण व संयुक्तीक पुरावा दिलेला नाही. त्यामुळे अर्जदाराचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली तसेच अर्ज मंजूर करणेचे मत झाल्यास प्रतिवादीस जास्तीत जास्त दंड करणेची विनंती केली.

४. वादी व प्रतिवादीच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

५. अर्ज वाचला. अर्जामधील कथने प्रतिवादीनी शपथेवर सांगितलेली आहेत. दाव्यातील रेकॉर्ड तपासले. प्रतिवादी यांना दि. २६/०१/२०२१ रोजीचे समन्स प्राप्त झाले होते तसेच त्यानंतर कोव्हीड–१९ च्या महामारीसदृश्य परिस्थीतीमुळे कागदपत्रे काढून वकीलांना भेटून म्हणणे व कैफियत मांडत आले नाही. हे सदरचे प्रतिवादींचे म्हणणे त्यांनी शपथेवर नमूद केलेले आहे. त्यावरून प्रतिवादीच्या

सांगण्यात सत्यता असल्याचे पटते व सदरचे कारण योग्य वाटते. दावा हा डिक्लेरेशन व कायम मनाई हुकूमाकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादीची कैफियत अभिलेखावर आलेस वादातील मूळ प्रश्नाची निर्णिती करण्यास न्यायालयास मदत होणार असून त्यामुळे वादीचे कसलेही नुकसान होणार नाही. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## **आदेश**

१. प्रतिवादींचा अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. खर्चाबाबत कोणतेही आदेश नाहीत.

Sdxxxx

आटपाडी **(अनंत रा. टेंगसे )**

दि. २९/११/२०२१ सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आटपाडी.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file judgment/order are same, word to word, as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | A.A.Jamadar (L.G.) |
| Court. | : | Jt. Civil Judge, Jr.Dn., Atpadi. |
| Date. | : | 29.11.2021. |
| Judgment/order signed by the Presiding Officer on. | : | 29.11.2021. |
| Judgment uploaded on. | : | 29.11.2021. |